**दि.१३/०७/२०१९**

# प्रेसनोट

## मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.

## कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत पोलीस ठाणे आवारात केली वृक्षलागवड

दि.०९/०७/२०१९ रोजी मुंढवा पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संपतराव डी. भोसले यांनी पोलीस ठाणे आवारामध्ये वृक्ष लागवड हा उपक्रम राबविण्याकरीता पोलीस ठाणे हद्दीमधील प्रतिष्टीत नागरी, नगरसेवक, तसेच शांतता कमिटी सदस्या, जेष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष यांना आमत्रित करुन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमामध्ये प्रत्येक पोलीस अधिकारी, कर्मचारी व स्थानिक नागरीक यांनी पोलीस ठाणेच्या परिसरामध्ये वृक्षारोपन केले व त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संपतराव डी. भोसले यांनी सदरचा कार्यक्रम आयोजीत करण्यामागील होतू हा पर्यावरण जनजागृतीसह पोलीस ठाणे हद्दीतील नागरीक व पोलीसांमधील एकोप्याची भावना वाढावी व ऐकमेकांमधील जिव्हाळयाचे संबंध निर्माण करणे हा असल्याबाबत संबोधीत केले.

सदर कार्यक्रमाबाबत पोलीस ठाणे हद्दीतील पदाधिकारी व नागरीक यांनी स्वागत केले असून, पोलीसांनी राबविलेल्या उपक्रमाबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संपतराव भोसले यांचे आभार मानले.

तरी नमूद पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

